जल प्रदूषण न करणाऱ्या लघु उद्योगांना जल [प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण] अधिनियम, १९७४ अन्वये संमतीपत्र शुल्क भरण्यापासून सूट देणे व जल व हवा [प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण] या दोन्ही अधिनियमान्वये संमतीपत्रासाठी लागणाऱ्या शुल्कामध्ये बदल करणे.....

महाराष्ट्र शासन
पर्यावरण विभाग, मंत्रालय,
शासन निर्णय क्रमांक: इसनव्ही/१०८८/६७२ सीआर-१८५/का-१,
नविन प्रशासन भवन १५ वा मजला, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२. दिनांक १८ मार्च, १९९२.

## शासन निर्णय

जल [प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण] अधिनियम, १९७४ च्या कलम २५ व २६ अन्वये उद्योग व स्थानिक स्वराज्य संस्थांना सांडपाण्याची विल्हेवाट लावण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून संमतीपत्र घेणे आवश्यक असते. त्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे शासनाने ठरविलेल्या विहित नमुन्यात व शुल्कासह अर्ज करणे आवश्यक आहे. या अधिनियमाच्या तरतुदी सर्व उद्योगांना व स्थानिक स्वराज्य संस्थांना राज्यभरात लागू आहेत. , महाराष्ट्र जल [प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण] नियम, १९८३ च्या नियम २८[२] अन्वये अनुसूची प्रमाणे उद्योगांना संमतीपत्रासाठीचे शुल्क दैनंदिन किमान पाण्याच्या वापरावर आधारीत आहे व स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांच्या लोकसंख्येच्या आधारे संमतीपत्र शुल्क आकारण्यांत येते. हवा [प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण] अधिनियम, १९८१ च्या कलम २१ अन्वये उद्योगांना हवा प्रदूषणासंबंधी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून संमतीपत्र घेणे आवश्यक असते, या अधिनियमाच्या तरतुदी सर्व प्रकारच्या उद्योगांना लागू असल्या तरी त्यांचे कार्यक्षेत्र मुंबई महानगर प्रदेश तसेच रोहा, तारापूर व पातालगंगा या औद्योगिक क्षेत्रांपुरतेच मर्यादित आहे. संमतीपत्रासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे विहित नमुन्यात शुल्कासह अर्ज करणे आवश्यक असते. महाराष्ट्र हवा [प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण] नियम, १९८३ च्या नियम २२ अन्वये अनुसूचीप्रमाणे प्रत्येक कारखान्यात उत्पादनातील प्रकारानुसार संमतीपत्रासाठी शुल्क द्यावे लागते.

२. महाराष्ट्रातील मराठा चेंबर ऑफ कॉमर्स व इतर संस्थानी प्रदूषण न करणाऱ्या लघु उद्योगांना संमतीपत्र घेण्यापासून सूट देण्यांत यावी अशी मागणी केली होती. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने जल प्रदूषण न करणाऱ्या लघु उद्योगांची गांगुली समितीच्या अहवालाच्या आधारे वर्गवार यादी केली असून शासनाला या उद्योगांना संमतीपत्र घेण्यापासून सूट मिळावी अशी शिफारस केली आहे. जल [प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण] अधिनियम, १९७४ तसेच हवा [प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण] अधिनियम, १९८१ या दोन्ही केंद्रिय अधिनियमात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून संमतीपत्र मिळविण्यापासून सूट देण्याची तरतूद नाही, असे विधी व न्याय विभागाने स्पष्ट केले आहे.

यास्तव वित्त विभागाने असे पर्याय सुचविले होते की, जल प्रदूषण न करणा-या लघु उद्योगांकडून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे सुलभ नमुन्यात अर्ज घ्यावा. या अर्जात नियोजित उत्पादन वस्तु व उत्पादन प्रक्रियेचे वर्णन असावे, तसेच लघु उद्योगांनी त्यांचे कारखान्यापासून कुठल्याही प्रकारचे प्रदूषण होणार नाही याबद्दल हमीपत्र देखील द्यावे. या आधारावरच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने अशा उद्योग घटकांना संमतीपत्र द्यावे व त्यासाठी कोणतेही शुल्क आकारू नये. यामुळे प्रदूषण न करणा-या लघु उद्योगांना लागू असलेल्या पध्दतीमध्ये सुलभीकरण करणे शक्य होईल. परंतु अशाप्रकारे जल प्रदूषण न करणा-या लघु उद्योगांकडून संमतीपत्रासाठी शुल्क न आकारल्यास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला होणारा तोटा भरून काढणे तसेच संमतीपत्राच्या अर्जाची छाननी करण्यामध्ये मंडळाला होणारा खर्च लक्षात घेता इतर प्रकारच्या औद्योगिक घटकांकडून आकारण्यांत येणा-या संमतीपत्र शुल्कामध्ये वाढ करता येईल. केंद्रिय प्रदूषण नियंत्रण मंडळाने याबाबत अभ्यास करण्यासाठी नेमलेल्या समितीने संमतीपत्राचे शुल्क वाढविण्यासाठी ज्या शिफारशी केल्या आहेत त्याआधारे सुधारणा करण्याचे शासनाने ठरविले आहे.

३. शासनाने केंद्रिय समितीने केलेल्या शिफारसी व त्यावर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या अभिप्रायाचा सर्वांगीण विचार करून पुढील प्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

[अ] जल [प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण] अधिनियम व हवा [प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण] अधिनियमांतर्गत दोन प्रकारची संमतीपत्रे आवश्यक राहतील व त्यासाठी खालील दराने अर्जशुल्के आकारण्यांत येतील.

उद्योग सुरू करण्यासाठी [जल व हवा अधिनियमानुसार एकत्रित]

| | |
|---|---|
| ज्या उद्योगांची गुंतवणूक रु. १० कोटीच्या वर आहे | - रु. २०,००० |
| ज्या उद्योगांची गुंतवणूक रु. १० कोटीच्या आंत परंतु रु. ५ कोटीच्या वर | - रु. १०,००० |
| ज्या उद्योगांची गुंतवणूक रु. ५ कोटीच्या आंत परंतु रु. १ कोटीच्या वर | - रु. ५,००० |
| ज्या उद्योगांची गुंतवणूक रु. १ कोटीच्या आंत परंतु रु. ६० लाखच्या वर | - रु. २,००० |
| ज्या उद्योगांची गुंतवणूक रु. ६० लाखच्या आंत परंतु रु. १० लाखच्या वर | - रु. १,००० |
| ज्या उद्योगांची गुंतवणूक रु. १० लाखच्या आंत | - रु. २०० |

उद्योग चालविण्यासाठी [जल व हवा अधिनियमानुसार स्वतंत्रपणे]

| | |
|---|---|
| ज्या उद्योगांची गुंतवणूक रु. १० कोटीच्या वर | - रु. १०,००० |
| ज्या उद्योगांची गुंतवणूक रु. १० कोटीच्या आंत परंतु रु. ५ कोटीच्या वर | - रु. ५,००० |

| | |
|---|---|
| ज्या उद्योगांची गुंतवणूक रु. ५ कोटीच्या आंत परंतु रु. १ कोटीच्या वर | – रु. २,५०० |
| ज्या उद्योगांची गुंतवणूक रु. १ कोटीच्या आंत परंतु रु. ६० लाखाच्या वर | – रु. १,००० |
| ज्या उद्योगांची गुंतवणूक रु. ६० लाखाच्या आंत परंतु रु. १० लाखाच्या वर | – रु. ५०० |
| ज्या उद्योगांची गुंतवणूक रु. १० लाखाच्या आंत | – रु. २०० |

स्थानिक स्वराज्य संस्थासाठी [फक्त जल अधिनियमान्वये]

| | |
|---|---|
| महानगरपालिका | – रु. २०,००० |
| "अ" वर्ग, नगर परिषद | – रु. १०,००० |
| "ब" वर्ग, नगर परिषद | – रु. ५,००० |
| "क" वर्ग, नगर परिषद | – रु. २,००० |

अर्जाचे नमुने ४ प्रतीत पुरविण्यासाठी म. प्र. नि. मंडळातर्फे रु. २५ आकारले जातील.

[ब] केंद्रिय समितीने केलेल्या वर्गवारीनुसार लाल, नारींगी व हरित संवर्गातील उद्योगांना उद्योग चालविण्यासाठी संमतीपत्राचे नुतनीकरण [जल व हवा अधिनियमानुसार स्वतंत्रपणे] अनुक्रमे १, २ व ३ वर्षानंतर व स्थानिक स्वराज्य संस्थांना २ वर्षानंतर करणे आवश्यक राहील व त्यासाठी वरील उपपरिच्छेद [अ] मध्ये प्रस्तावित केलेल्या दराने अर्ज शुल्के आकारण्यांत येतील.

[क] परिशिष्ट-१ मध्ये दर्शविलेल्या जल प्रदूषण न करणा-या नोंदणीकृत लघु उद्योग घटकांना जल [प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण] अधिनियमांतर्गत संमतीपत्रासाठी अर्ज शुल्क आकारण्यात येणार नाही. परिशिष्ट-१ मधील उद्योगांची यादी ही नमुना दाखल दिलेली आहे. या यादीमध्ये प्रदूषण न करणा-या घटकांमध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी बदल करण्यांत येतील. सदर यादीतील एखादा उद्योग जर प्रदूषणकारी आढळल्यास त्या उद्योग घटकाला महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून हवा व जल अधिनियमांनुसार संमतीपत्र घेणे आवश्यक राहिल. तसेच परिशिष्ट-१ मधील उद्योग घटकांना परिशिष्ट-२ मधील नमुन्यात अर्ज, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे करण्याची सवलत देण्यांत येत आहे. शासन असाही आदेश देत आहे की, अशा अर्जांचा महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या उपप्रादेशिक अधिका-यांकडून त्वरित निपटारा करण्यांत यावा. मात्र त्याचे स्वरुप व ठिकाण लक्षात घेता ज्या घटकांना हवा [प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण] अधिनियमाच्या तरतुदी लागू आहेत

अशा सर्व उद्योगांकडून संमतीपत्रासाठी उपपरिच्छेद [अ] मधील दराने त्या अधिनियमांतर्गत संमतीपत्रासाठी अर्ज शुल्क आकारण्यांत यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

म. ल. बिराडकर,
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.